तरुण भारत

गुरुवार, १५ जानेवारी २०१५

# दोडामार्ग कॉलेज खाद्य महोत्सव स्पर्धेत छाया तळणकर प्रथम

**दोडामार्ग :** येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या खाद्य महोत्सव स्पर्धेत छाया बाबुली तळणकर हिने प्रथम क्रमांक पटकाविला. द्वितीय ईशा गणपत बर्वे, तृतीय निकिता विश्वनाथ नाईक तर उत्तेजनार्थ पारितोषिक शिवानी गवस, श्वेता धर्णे, रुची नेवरेकर यांना देण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नवनिर्माण शिक्षण संस्थेचे सदस्य सूर्यकांत परमेकर, स्थानिक नियामक समितीचे सदस्य विवेकानंद नाईक उपस्थित होते. परीक्षक म्हणून सौ. स्मिता फातर्फेकर व सौ. मेघा जोशी यांनी काम पाहिले. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.